# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची नववी बैठक दिनांक २१/६/९७ रोजी मा. मंत्री(पाटबंधारे) व अध्यक्ष, महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झाली. सदर बैठकीत खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक ९/१

'ठराव करण्यात येतो की,

१) नियामक मंडळाच्या दिनांक १०-४-९७ रोजी झालेल्या आठव्या बैठकीतील मंजूर झालेले ठराव क्रमांक ८/१ ते ८/५ वाचून कायम करण्यात येत आहेत.

२) ठराव क्रमांक ८/६ संदर्भात पुढील बैठकीमध्ये पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी दिलेल्या टँकर्सचा एकूण खर्च, किती टँकर्स महसूल खात्यास दिले व किती महिने महसूल खात्याकडे आहेत याबाबतचा तपशील सादर करण्यात यावा व त्याआधारे महसूल खात्याकडून टँकर्सच्या दुरुस्तीचा खर्च व भाडे घेण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा. तसेच, निवडणूक इत्यादि कारणासाठी महामंडळाच्या अधिग्रहीत केलेल्या वाहनांचीही माहिती नियामक मंडळास सादर करावी.

३) ठराव क्रमांक ८/७ संदर्भात शासनाच्या अर्थ खात्यामार्फत ज्याप्रमाणे प्रकल्पनिहाय अंदाजपत्रक तयार केले जाते, त्याच धर्तीवर महामंडळाचे १९९७-९८ चे अंदाजपत्रक तयार करावे. सदरचे अंदाजपत्रकाची प्रत सदस्यांना बैठकीपूर्वी किमान दोन दिवस आधी द्यावी व दिनांक ५-७-९७ रोजी किंवा बैठकीची तारीख निश्चित होईल त्या दिवशी फक्त अंदाजपत्रकावर चर्चा करुन मान्यता देण्यासाठी नियामक मंडळाची बैठक बोलावण्यात यावी.

ठराव क्रमांक ९/२

''ठराव करण्यात येतो की, उरमोडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील व धरणस्थळावरील प्रकल्पग्रस्तांना, खास बाब म्हणून, रु.६.८४ कोटीचे सानुग्रह अनुदानाबाबतचा प्रस्ताव राज्य मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ त्वरित सादर करावा.'

| | |
|---|---|
| मा. मंत्री(पाटबंधारे) व अध्यक्ष, | कार्यकारी संचालक, |
| म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे | म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे |

ठराव क्रमांक ९/३

'' ठराव करण्यात येतो की,

१. कृष्णा खोऱ्यातील पूर्ण, बांधकामाधीन, अन्वेषणाधीन मोठया, मध्यम प्रकल्पातून '' बिगरसिंचन पाणीपुरवठा स्त्रोत'' म्हणून गृहित धरण्यापूर्वी संबंधित संस्थेने महामंडळाच्या नियामक मंडळाची लेखी पूर्व परवानगी घ्यावी.

२. महामंडळाचे कार्यकारी संचालक, यांनी सर्व मोठया व मध्यम प्रकल्पांतून बिगरसिंचनासाठी अद्यावत मागणीचा विचार करुन, बिगरसिंचनासाठी १५% मर्यादेपर्यंत सिंचनकपात व औद्योगिक वापरासाठी ५% मर्यादेपर्यंत इतकी सिंचनकपात करुन, प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनास महामंडळाच्या नियामक मंडळाची मंजूरी घ्यावी.

३. वरीलप्रमाणे पिण्यासाठी १५% मर्यादेपर्यंत व औद्योगिक वापरासाठी ५% मर्यादेपर्यन्त सिंचन कपात करण्याच्या सुधारित जलनियोजनास महामंडळाची मंजुरी दिल्यानंतर, या मर्यादेपर्यंत बिगरसिंचनाच्या मागण्या नियामक मंडळाकडून मान्य करुन घेण्यात याव्यात.

४. लघुपाटबंधारे प्रकल्पातून बिगरसिंचनासाठी (पिण्याच्या पाण्याचे वगळून) परवाने देण्यात येऊ नयेत.

५. पाटबंधारे प्रकल्पातून बिगरसिंचन पाणीपुरवठयासाठी झालेला / होणारा धरणाच्या जलसाठा करण्याचा यथाप्रमाण खर्च (proportionate storage cost) महामंडळास द्यावा, अशी तरतूद संबंधित संस्थेवरोबर करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये करावी.''

६. एखाद्या संस्थेने पिण्याच्या व औद्योगिक वापरासाठी पाण्याचे आरक्षण केल्यावर जर त्यासंस्थेने पाण्याचे पैसे नियमानुसार दिले नाहीत किंवा / आणि थकबाकी ठेवली तर महाराष्ट्र सिंचन कायदा १९७६ अन्वये संबंधितांचा पाणीपुरवठा बंद करण्याचे दिलेले अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत''.

मा. मंत्री(पाटबंधारे) व अध्यक्ष,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

कार्यकारी संचालक,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

ठराव क्रमांक ९/४

'' ठराव करण्यात येतो की, मत्स्योत्पादनाच्या लिलावांसंदर्भात प्रस्तावित ठराव क्रमांक ९/४ वर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात यावा. ''

ठराव क्रमांक ९/५

'' ठराव करण्यात येतो की, कुकडी प्रकल्प - डिंभे धरण - लवाद क्रमांक ३ च्या निवाडयाबाबत राज्याच्या 'ॲडव्होकेट जनरल' यांचा सल्ला घेऊन तो नियामक मंडळापुढे ठेवण्यात यावा. ''

ठराव क्रमांक ९/६

''ठराव करण्यात येतो की, निविदा पध्दती अधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टिने

१. निविदा सूचनेची एक प्रत वृत्तपत्रात प्रसिध्दीस देतांना सर्व सदस्यांना पाठविण्यात यावी.

२. महामंडळातील सर्व कामांची पूर्वअर्हता कागदपत्रे तसेच सर्व कामांच्या कोऱ्या निविदांचे संच अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातून तसेच महामंडळाच्या पुणे येथील कार्यालयातून सुध्दा विक्रीसाठी ठेवण्यात यावेत.

३. सर्व कामांच्या सीलबंद निविदा तसेच सीलबंद पूर्वअर्हता कागदपत्रे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात यावीत व संबंधित अशासकीय सदस्यांच्या सहभागाने सर्व निविदा उघडण्यात याव्यात.''

ठराव क्रमांक ९/७

''ठराव करण्यात येतो की,

१. उपविभाग दर्जाचे महामंडळाचे एक संपर्क कार्यालय मुंबई येथे निर्माण करण्यात यावे.

२. अशासकीय सदस्यांसाठी नवीन आमदार निवासामध्ये एक निवासस्थान कायमस्वरुपी आरक्षित करण्यात यावे. ''

[illegible]

मा. मंत्री(पाटबंधारे) व अध्यक्ष,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

कार्यकारी संचालक,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे